# बृहन्मुंबई महानगरपालिका
## सार्वजनिक आरोग्य खाते
## मुंबई जिल्हा क्षयरोग नियंत्रण संस्था
रजि.नं.: ८७९ / १९९८ जि.बी.बी.एस.डी.
उप कार्यकारी आरोग्य अधिकारी (क्षय) यांचे कार्यालय पहिला मजला, बावलावाडी म्युनिसिपल कार्यालय इमारत.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, व्होल्टास हाऊसच्यासमोर, चिचपोकळी मुंबई - ४०००१२
टेलि : २३७२ ६२४८, टेलिफॅक्स: २३७२ ६२२९, ई मेल - dtomhbmc@rntcp.org


क्र.मुंजिक्षनिसं/३२४९/क्षय दिनांक – ०८/०४/२०२५

Google Form Link - https://forms.gle/9rw5nYjFnr9N4kth8
(https://arogya.maharashtra.gov.in , https://portal.mcgm.gov.in, www.nrhm.maharashtra.gov.in)

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत, मुंबई महानगरपालिके अंतर्गत, मुंबई जिल्हा क्षयरोग नियंत्रण संस्थे करिता राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत अंतर्गत रिक्त असलेल्या पदांची पदभरती प्रक्रियेसाठी खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे निव्वळ कंत्राटी स्वरूपात व करार पध्दतीने मानधन तत्त्वावर करावयाची आहे. तरी इच्छुक व पात्र उमेदवारांनी विहित नमुन्यात अर्ज **मुंबई जिल्हा क्षयरोग नियंत्रण संस्था,उप कार्यकारी आरोग्य अधिकारी (टीबी) यांचे कार्यालय, पहिला माळा, बावलावाडी म्युनिसिपल कार्यालय, व्होल्टास हाऊस समोर, डॉ. बी.आंबेडकर रोड, चिंचपोकली (पू),मुंबई – ४०००१२** येथे दिनांक ११/०४/२०२५ ते २५/०४/२०२५ पर्यंत अर्ज सादर करावे.

| अ क्र | पदाचे नाव | प्रवर्ग | शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी (जिल्हा क्षयरोग केंद्र) (MODTC) | अज ०१, विजा-अ ०१, भज - ब ०१, इमाव ०२ एकुण – ०५ | **Essential Qualification**: -<br>1. MBBS or equivalent degree from Institution recognized by Medical Council of India; Must have completed compulsory rotatory internship<br>**Preferential Qualification**: -<br>1.Diploma / MD Public Health / PSM / Community medicine / CHA / Tuberculosis & Chest Diseases<br>2. One-year experience in NTEP<br>3. Basic Knowledge of computers. | उच्चतम वयोमर्यादा ७० वर्ष | ६०००० |
| २ | वरीष्ठ वैद्यकीय अधिकारी (SRMO) | विजा-अ ०१, इमाव ०१ सा शै मा प्र ०१, अदुघ ०१ एकुण – ०४ | **Essential Qualification**: -<br>1. MBBS or equivalent degree from Institution recognized by Medical Council of India; Must have completed compulsory rotatory internship<br>**Preferential Qualification**: -<br>1.Diploma / MD Public Health / PSM / Community medicine / CHA / Tuberculosis & Chest Diseases<br>2. One-year experience in NTEP<br>3. Basic Knowledge of computers. | उच्चतम वयोमर्यादा ७० वर्ष | ६०००० |
| ३ | वैद्यकीय अधिकारी (वैद्यकीय महाविद्यालये ) (MO-Medical College) | विजा-अ ०१, इमाव ०१, खुला ०१ एकुण – ०३ | **Essential Qualification: -**<br>1. MBBS or equivalent degree from Institution recognized by Medical Council of India; Must have completed compulsory rotatory internship<br>**Preferential Qualification: -**<br>1.Diploma / MD Public Health / PSM / Community medicine / CHA / Tuberculosis & Chest Diseases<br>2. One-year experience in NTEP<br>3. Basic Knowledge of computers. | उच्चतम वयोमर्यादा ७० वर्ष | ६०००० |

Mahabharti.in

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ (Microbiologist) | अज ०१<br>एकुण – ०१ | **Essential Qualification**: -<br>1. MD Microbiology/Ph. D Medical Microbiology<br>2.M.Sc. Medical Microbiology.<br>**Preferential Qualification**: -<br>1. Three Years of work Experience in Bacteriology/ Three Years of work Experience in Bacteriology/ Five Years of work Experience in Bacteriology | उच्चतम वयोमर्यादा ६५ वर्ष | ७५००० MD, Ph. D Medical Microbiology/<br>४०००० M.Sc. Medical Microbiology |
| ५ | साथीचे रोग विशेषज्ञ/ एपिडेमियोलॉजिस्ट (सहाय्यक कार्यक्रम अधिकारी) | खुला ०१<br>एकुण – ०१ | **Essential Qualification**: -<br>1. MBBS Or equivalent degree form institution recognized by Medical council of India, must have completed compulsory rotatory internship<br>or<br>2. Master's Degree in Public Health/Hospital Administration or PHD in Epidemiology/Statistics/Community health/ Public health after graduation<br>3. Two years' Experience in any public health programme<br>**Preferential Qualification**: -<br>1. One Year Experience in NTEP<br>Working Knowledge | उच्चतम वयोमर्यादा ६५ वर्ष | ५५००० अधिक ५००० MBBS करिता |
| ६ | वरिष्ठ डॉट्स प्लस क्षय-एचआयव्ही पर्यवेक्षक (SDPS) | अज ०१,<br>सा शै मा प्र ०१,<br>एकुण – ०२ | **Essential Qualification**: -<br>1. Graduate<br>2. Recognized Sanitary Inspector's Course, and Certificate course in Computer operation (Minimum 2 Months)<br>3. Permanent Two Wheeler License & should be able to drive two Wheeler.<br>**Preferential Qualification**: -<br>1. At-least 2 years of work experience under NTEP or 5 years' experience in any public health programme in a Supervisory Capacity<br>2. Good communication skills in local language & willing to travel in the area of work | उच्चतम वयोमर्यादा ६५ वर्ष | २०००० |
| ७ | सांख्यिकी सहायक (Statistical Assistant) | इमाव ०१<br>एकुण - ०१. | **Essential Qualification**:<br>1. Graduate in any diploma in computer application, or equivalent recognized by the Council for Technical Education /DEO, Acc<br>2. Typing Speed of 40 WPM, in English & local Language<br>3. Candidate Should be well Conversant with Various Computer Programming include Excel, MS. Word, PPT). and simple Statistical Package.<br>**Preferential Qualification**: -<br>1. One Year experience in related field | उच्चतम वयोमर्यादा ६५ वर्ष | ३०००० |

Mahabharti.in

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८ | टी.बी.हेल्थ व्हीजीटर (TB Health Visitor) | विजा-अ ०३, भज-क ०२, इमाव ०२, सा शै मा प्र ०५ अदुघ ०४. एकुण- १६ | **Essential Qualification**: -<br>1.Graduate in science OR<br>2.Intermediate (10+2) in science and experience of working as MPW/LHV/ANM/Health worker certificate or Higher course in Health Education/Counselling<br>3.Tuberculosis health visitor's Recognized course<br>4.Certificate course in Computer operation (minimum two months)<br>**Preferential Qualification**: -<br>1.Training course for MPW OR Recognized Sanitary Inspector Course | उच्चतम वयोमर्यादा ६५ वर्ष | १५५०० + १५०० (TA) |
| ९ | औषध निर्माता (Pharmascist) | अजा ०१, अज ०१ एकुण – ०२ | **Essential Qualification**: -<br>1. Degree/ Diploma in Pharmacy form recognized University<br>**Preferential Qualification**: -<br>1. One Year experience in Managing Drug Store in reputed Hospital/ Health Centre recognized by Govt.<br>2. Candidate Should be well Conversant with Various Computer Programming include Excel, MS. Word, PPT). and simple Statistical Package. | उच्चतम वयोमर्यादा ६५ वर्ष | १७००० |
| १० | प्रयोगशाळा तंत्रज्ञ (Lab Technician) | विमा-प्र ०१, एकुण- ०१ | **Essential Qualification**: -<br>1. Intermediate (10+2) and Diploma or certified course in Medical Laboratory Technology or equivalent<br>**Preferential Qualification**: -<br>1. One Year experience in NTEP or Sputum smear microscopy<br>2. Candidate with higher qualification (for example Graduates) shall preferred | उच्चतम वयोमर्यादा ६५ वर्ष | १७००० |
| ११ | पी.पी.एम. समन्वयक (PPM Coordinater) | अज ०१, एकुण - ०१. | **Essential Qualification**: -<br>1. Post Graduate.<br>2. One Year experience of Working in Field of Communication/ACSM, Public-Private partnership/ Health Project<br>3. Permanent two wheeler driving license & should be able to drive two wheeler<br>**Preferential Qualification**: -<br>1. Preference to those who have worked in NTEP.<br>2. Certificate / Diploma/ Degree/ Masters holder in Social Science/ Mass Media communication/ Rural Development advocacy/ Partnership Related Filed.<br>3. Certificate course in Computer operation (minimum two months) | उच्चतम वयोमर्यादा ६५ वर्ष | २०००० |
| १२ | भंडार सहाय्यक (Store Assistant) | अज ०१, एकुण - ०१. | **Essential Qualification**: -<br>1.Intermediate (10+2)<br>**Preferential Qualification**: -<br>1.Diploma in Pharmacy<br>2.Conversant with Various Computer Programming including MS Word, Excel & Simple statistical Package | उच्चतम वयोमर्यादा ६५ वर्ष | १७००० |
| १३ | वरिष्ठ उपचार पर्यवेक्षक | विजा-अ ०१, भज-ब ०१, भज-क १, भज-ड १, सा शै | **Essential Qualification**: -<br>1. Bachelor's Degree, Recognized Sanitary Inspector's Course.<br>2. Certificate course in Computer Operation (minimum 2 months) | उच्चतम वयोमर्यादा ६५ वर्ष | २०००० |

Mahabharti.in

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | (Senior Treatment Supervisor) | मा प्र ०१<br>एकुण- ०५ | 3.Permanent two wheeler driving license & should be able to drive two wheeler<br>**<u>Preferential Qualification</u>**: -<br>1.Tuberculosis health visitor's recognized course Govt. recognized degree / diploma in social work or Medical social work<br>2.Successful completion of basic training course (Govt. recognized) for multi-purpose health visitor. | | |
| १४ | वरिष्ठ प्रयोगशाळा तंत्रज्ञ (SR.LT) | अजा ०१,<br>अज ०१,<br>भज-क ०१,<br>इमाव ०२,<br>सा शै मा प्र ०२ अदुघ ०१<br>एकुण – ०८ | **<u>Essential Qualification</u>**: -<br>1. M.Sc. medical Microbiology/ Applied Microbiology/ General Microbiology/ Biotechnology/ Biochemistry with or without DMLT.<br>**<u>Preferential Qualification</u>**: -<br>1. Three Years work experience in TB Bacteriology.<br>2. Five Years work experience in TB Bacteriology | उच्चतम वयोमर्यादा ६५ वर्ष | २५००० |

**राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत मुंबई महानगरपालिके अंतर्गत रिक्त पदभरतीच्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचना**

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यानुसार मंजुर पदांपैकी रिक्त पदे भरण्याकरीता जाहिरात www.nrhm.maharashtra.gov.in, https://portal.mcgm.gov.in/ या संकेत स्थळावर व स्थानीय वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात येत असून अर्ज करावयाच्या पध्दतीबाबत सर्वसाधारण सुचना / माहिती खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

सर्व सूचनांचे काळजीपूर्वक वाचन करून अर्ज विहित केलेल्या पध्दतीनुसारच सादर करावा. अर्जामध्ये दिलेल्या नमुद माहितीच्या आधारे व मुलाखती दरम्यान सादर केलेल्या प्रमाणपत्रांच्या/कागद पत्रांच्या आधारे उमेदवार पात्र व अपात्र ठरविण्यात येईल. व त्या आधारे त्याचा समावेश पुढील निवड प्रक्रियेत करण्यात येईल.

अर्ज स्वीकारण्यात आला किंवा पुढील निवड प्रक्रियेत समावेश करण्यात आला म्हणजे उमेदवाराची निवड झाली असा होणार नाही. निवड प्रक्रियेदरम्यान कोणत्याही वेळी किंवा उमेदवाराच्या निवडी नंतर अर्जदार विहित अर्हता धारण करीत नसल्याने किंवा कोणत्याही कारणास्तव अपात्र ठरत असल्याचे निदर्शनास आल्यास अशा उमेदवाराची उमेदवारी / निवड तात्काळ रद्द करण्यात येईल.

क) अर्ज करण्याच्या अनुषंगाने सुचना –

Google Form Link - https://forms.gle/9rw5nYjFnr9N4kth8

१) सर्व उमेदवारांनी खालील कार्यालयात उपलब्ध फॉर्म मध्येच अर्ज विहित कालावधीत भरणे आवश्यक आहे.

मुंबई महानगरपालिका स्तरावरील रिक्त पदाकरिता -

१) अर्जात दिलेल्या प्रत्येक मुद्याची माहिती अचूक भरावी. एकदा भरलेली माहिती अंतिम समजण्यात येईल व त्यात कोणताही बदल करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

२) पुर्ण भरलेल्या फॉमची स्वसाक्षांकित प्रत व (ट) मधील मुद्दा क्र.7 नुसार सर्व कागदपत्रे **मुंबई जिल्हा क्षयरोग नियंत्रण संस्था,उप कार्यकारी आरोग्य अधिकारी (टीबी) यांचे कार्यालय, पहिला माळा, बावलावाडी म्युनिसिपल कार्यालय, व्होल्टास हाऊस समोर, डॉ. बी.आंबेडकर रोड, चिंचपोकली (पू),मुंबई – ४०००१२** (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून) प्रत्यक्षात (By Hand) व कुरीअरने सादर करण्यात यावेत. दिलेल्या मुदती नंतर सादर करण्यात येणा-या अर्जाचा विचार केला जाणार नाही. (टपालाने / कुरीयरने सादर करण्यात आलेले अर्ज विहीत कालावधीत या कार्यालयात पोहोचतील याची दक्षता घ्यावी. उशीरा प्राप्त अर्जाची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावीं.)

३) अर्जदाराने प्रत्यक्ष भरलेल्या फॉर्मची प्रत या कार्यालयास प्राप्त नसल्यास असा अर्ज अपूर्ण समजण्यात येऊन तो रद्द करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

ख) वयोमर्यादा -

१) अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिनांकास म्हणजेच दि. २५/०४/२०२५ रोजी उमेदवाराचे वय जाहिरातीत विहित केलेल्या वयोमर्यादेत असणे आवश्यक आहे.

Mahabharti.in

२)	मा.आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे दि.२५ मे २०१९ रोजीच्या पत्रानुसार अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकास उमेदवाराचे एम बी बी एस, विशेष तज्ञ आणि अति विशिष्ठ विशेष तज्ञ यांची वयोमर्यादा ७० वर्ष व रुग्णसेवेशी संबंधित इतर पदांची वयोमर्यादा ६५ वर्ष राहील. वयाच्या ६० किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या उमेदवारदांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांचे कडुन प्राप्त केलेले शारिरीक दृष्टया व मानसिक दृष्टया सक्षम असल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे बंधन कारक राहील.

ग) अर्ज भरण्या बाबतच्या सुचना –

Google Form Link - https://forms.gle/9rw5nYjFnr9N4kth8 & QR Code mention at last.

१)	उमेदवाराने स्वतःचे पूर्ण नाव माध्यमिक शाळा प्रमाणपत्राप्रमाणेच अचूकपणे नोंदवावे. अर्जासोबत माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्राची प्रत जोडावी.

२)	माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाण पत्रामध्ये नमूद केलेली जन्मतारीखच अर्जात नमूद करावी.

३)	जाहिरात प्रसिध्द केलेल्या दिनांकापर्यत असणारे उमेदवाराचे वय (दिवस, महिने व वर्ष) अर्जात अचूक नमुद करावे.

४)	अर्जात उमेदवाराचे लिंग या बाबतची माहिती नमूद करावी.

५)	अर्ज करीत असणारी अर्जदार विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र तसेच नाव बदल असल्यास राजपत्र (Gazette) अर्जा सोबत सादर करणे आवश्यक आहे..

६)	अर्जामध्ये उमेदवाराने स्वतःचा वैध ई-मेल आयडी/पर्यायी ई-मेल आयडी, चालू भ्रमणध्वनीचा क्रमांक/पर्यायी भ्रमणध्वनीचा क्रमांक नमूद करणे बंधनकारक आहे. मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना मुलाखती संदर्भात देण्यात येणा-या सुचना ई-मेलव्दारे देण्यात येतील. पात्र उमेदवारांची यादी उपरोक्त नमुद संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. सदर ई-मेल आयडी पदभरती प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत चालू राहील व ई-मेल वेळोवेळी तपासण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

७)	पदभरतीबाबत पात्र/अपात्र ठरणाऱ्या उमेदवारांची यादी आणि पदभरती बाबतच्या आवश्यक सुचना व सुधारणा वेळोवेळी सदर www.nrhm.maharashtra.gov.in, https://portal.mcgm.gov.in/ संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात येतील याकरिता वेळोवेळी संकेतस्थळावर भेट देणे देखील बंधनकारक आहे.

८)	उमेदवार महाराष्ट्र राज्याचा अधिवास आहे किंवा कसे हे नमूद करणे आवश्यक आहे, असल्यास त्याबाबतचे विहीत प्रमाणपत्र (**Domicile Certificate**) अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

९)	उमेदवाराने आपला जातीचा तपशील अचूकपणे नमूद करावा.

१०)	इतर मागासवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गात मोडणा-या उमेदवारांनी नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा अशा उमेदवारांचे अर्ज नाकारण्यात येतील.

११)	अर्जदाराने आपला सध्याचा पत्ता व कायम स्वरूपी पत्ता फॉर्म मध्ये अचूक नमूद करावा.

१२)	अर्जदाराविरुद्ध कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा, याबाबतचे हमी पत्र देण्यात यावे.

घ) शैक्षणिक अर्हता/पात्रता -

१)	शैक्षणिक अर्हते बाबतचा सविस्तर व अचूक तपशील नोंद करावा.

२)	अर्ज सादर करावयाच्या शेवटच्या तारखेला उमेदवाराकडे जाहिराती मध्ये नमुद केलेली शैक्षणिक अर्हता असणे आवश्यक आहे.

३)	अर्ज भरत असताना अंतिम वर्षाच्या मिळालेले गुण व गुणांची टक्केवारी अचूकपणे नमूद करावी. ग्रेड अथवा अन्य श्रेणी नमूद न करता गुण व गुणांची टक्केवारी नमूद करणे अनिवार्य आहे. प्रमाणपत्रात नमूद गुण व गुणांची टक्केवारी अर्जात नमुद टक्केवारी न जुळल्यास असे अर्ज नामंजूर करण्यात येतील.

४)	अंतिम प्रमाणपत्रामध्ये ग्रेड अथवा श्रेणी नमुद असल्यास संबंधित संस्थेकडून त्याचे गुणांमध्ये संबंधित संस्थेकडून प्रमाणित करून घ्यावे. मुलाखतीच्या वेळी ती सादर करावी.

५)	उमेदवारांची फॉर्ममध्ये नमुद माहितीनुसार अर्जाची छाननी करण्यात येईल.

६)	पात्र उमेदवारांनी मुलाखतीच्या दरम्यान आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या मूळ गुणपत्रिका सादर न केल्यास सदरील उमेदवारांना अपात्र ठरविले जाईल.

७)	पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता/पात्रता ही शासकीय मान्यता प्राप्त विद्यापीठातूनच प्राप्त केलेली असणे आवश्यक आहे.

Mahabharti.in

ड) अनुभव -

१) शैक्षणिक अर्हता व आवश्यक अतिरिक्त शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतरचा फक्त शासकीय व निम शासकीय अनुभव ग्राह्य धरण्यात येईल. त्यानुसार शैक्षणिक अर्हता धारण करण्यापूर्वीच्या अनुभवाची नोंद करण्यात येऊ नये. त्या अनुभवाची परिगणना करण्यात येणार नाही.

२) अनुभवाचा तपशील नमूद करीत असताना ज्या शासकीय व निम शासकीय कार्यालयाचे अनुभव प्रमाणपत्र प्राप्त आहे अशाच शासकीय व निम शासकीय कार्यालयाचा तपशील फॉर्ममध्ये नमूद करावा. अनुभव प्रमाणपत्र नसल्यास सदरचा अनुभव ग्राह्य धरण्यात येणार नाही. अनुभव प्रमाणपत्रामध्ये अनुभवाचा कालावधी सुस्पष्टपणे नमूद असावा.

३) अनुभव प्रमाणपत्रामध्ये तपशील नमूद करताना रूजू दिनांक व कार्यमुक्तीचा दिनांक अचूकपणे नमूद करावा. सदर कालावधी अनुभव प्रमाणपत्रानुसारच नोंदविण्याची दक्षता घ्यावी. यामध्ये तफावत आढळल्यास सदर प्रमाणपत्र अवैध ठरविले जाईल.

४) ज्या पदाकरीता अर्ज केला आहे त्या पदाकरीता आवश्यक असलेला अनुभवच ग्राह्य धरण्यात येईल. या व्यतिरिक्त इतर अनुभव असल्यास असा अनुभव विचारात घेतला जाणार नाही.

च) संगणक अर्हता -

१) MSCIT प्रमाणपत्र धारण करीत असल्याचा तपशील नमूद करावा.

२) Certificate course in Computer operation (minimum two months) प्रमाणपत्र धारण करीत असल्याचा तपशील नमूद करावा.

छ) लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र -

१) लहान कुटुंबाची अट दि.२३/०७/२०२० पासुन लागू करण्यात आली असून दि. २३/०७/२०२० पासुन दोन पेक्षा अधिक हयात मुले असणारे उमेदवार राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या पदभरतीसाठी अर्ज करण्यात पात्र ठरणार नाहीत.

२) विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र मुलाखतीस पात्र उमेदवाराने मुलाखती दरम्यान सादर करणे अनिवार्य आहे.

ज) अर्ज शुल्क -

१) उमेदवारास अर्जासोबत अर्ज शुल्काचा Online भरणा करणे आवशक असून त्याची पोचपावतीसोबत जोडणे आवश्यक आहे. खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरीता रू.१५०/- व राखीव प्रवर्गातील उमेदवारांकरीता रू.१००/- रकमेचा अर्ज शुल्क असेल. Online पद्धतीने **State Bank of India Name - Mumbai District TB Control Society. Ac no - 40864647195. IFSC Code- SBIN0001884.**

२) अर्ज शुल्काचा Online भरणा केलेल्या पावती शिवाय प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. ते अपात्र करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

झ) उमेदवाराचा फोटो व स्वाक्षरी -

१) उमेदवाराने फॉर्मची प्रिंट काढल्या वर फोटोकरीता राखीव जागेवर त्याचे अलीकडील काढलेला सुस्पष्ट फोटो चिकटवावा. फोटो स्टेपल करू नये.

२) स्वाक्षरी करीता राखीव जागेत स्वाक्षरी करावी.

त्र) निवड प्रक्रिया -

१) सदर पदभरतीच्या अनुषंगाने प्राप्त होणा-या अर्जाच्या संख्येनुसार निवड प्रक्रिया केवळ मुलाखतीद्वारे किंवा लेखी व मुलाखतीव्दारे ठरविण्याचे सर्व अधिकार मा. अध्यक्ष, निवड समिती यांच्याकडे राखुन ठेवले आहेत.

२) मुलाखतीव्दारे निवड करावयाची असल्यास मा. अध्यक्ष, निवड समिती यांच्या मान्यतेने मा.अतिरिक्त अभियान संचालक, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई यांच्या दि.१७/०३/२०२२ रोजीच्या पत्रानुसार निकष लावून १:३ व १:५ उमेदवारांची निवड मुलाखतीसाठी करण्यात येईल. मुलाखतीने उमेदवार निवडताना उमेदवाराचे गुणांकन पदवी परीक्षेतील अंतिम वर्षाचे गुण, अतिरिक्त अर्हता, अनुभव आणि मुलाखतीचे गुण विचारात घेऊन खालील तक्त्यानुसार करण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| अ | पदाकरीता आवश्यक किमान अर्हता | अंतिम वर्षातील एकूण प्राप्त गुणांच्या (टक्के वारीच्या) प्रमाणात ५० गुण |
| आ | पदाकरीता आवश्यक अतिरिक्त अर्हता/पदव्युत्तर अर्हता | अंतिम वर्षातील एकूण प्राप्त गुणांच्या (टक्के वारीच्या) प्रमाणात १० गुण |
| इ | पदाकरीता आवश्यक अनुभव | प्रत्येक वर्षा करीता ५ गुण (कमाल २० गुण) |
| ई | आवश्यकते नुसार मुलाखत | २० गुण |

Mahabharti.in

३)	मा. सहसंचालक (अतांत्रिक) राआअ, मुंबई यांच्या दि.२०/०७/२०१६ रोजीच्या पत्रानुसार बिंदुनामावली नुसार राखीव प्रवर्गास अनुसरुन पदभरती जाहीरात दिल्यानंतर पुढील प्रक्रियेव्दारे अपेक्षित राखीव प्रवर्गाचे उमेदवार पुरेशा प्रमाणामध्ये उपलब्ध न झाल्यास रिक्त पदांच्या भरतीची आवश्यकता लक्षात घेऊन व राष्ट्रीय आरोग्य अभियान काल मर्यादित राबविण्याचे अभियान आहे ही बाब लक्षात घेऊन ११ महिने २८ दिवस कालावधीसाठी प्रतिक्षा यादीतील निवड केलेल्या, खुल्या प्रवर्गातील पात्र उमेदवारांना तात्पुरती नियुक्ती देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

४)	सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१३/०८/२०१४ व दि. १९/१२/२०१८ च्या शासननिर्णयानुसार मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल.

ट) सर्वसाधारण सुचना-

१)	कार्यालया मार्फत उपलब्ध करुन देण्यात आलेला अर्ज उमेदवारांनी भरणे आवश्यक आहे.

२)	सदर पदभरती प्रक्रिये बाबतच्या सर्व आवश्यक सुचना व माहिती आरोग्य विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावरच वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल. या करीता उमेदवारांनी www.nrhm.maharashtra.gov.in, https://portal.mcgm.gov.in/ या संकेस्थळास भेट देऊन माहिती प्राप्त करुन घेणे अनिवार्य राहील. पदभरतीच्या अनुषंगाने कोणत्याही उमेदवारास वैयक्तिक संपर्क साधण्यात येणार नाही.

३)	जाहीरातीत नमूद केलेली पदे ही पुर्णतः कंत्राटी स्वरुपाची असून(११ महिने २८ दिवस) ती राज्यशासनाची नियमित पदे नाहीत या पदांचा राज्यशासनाच्या पदांशी काहीही संबंध नसून उमेदवार राज्यशासनांच्या नियमित पदावर समायोजन करण्यांची मागणी करु शकणार नाही.

४)	जाहीरातीत नमूद केलेले पदाचे वेतन हे एकत्रित मानधन आहे.

५)	निवड झालेल्या उमेदवारांना (UPHC) नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, ज्या महानगरपालिकेकरिता अर्ज सादर केलेला आहे त्या महानगरपालिकेतील रिक्त असलेल्या UPHC च्या ठिकाणी नियुक्ती देण्यात येईल, याची नोंद घ्यावी. नियुक्ती आदेश दिल्यानंतर 7 दिवसांच्या आत नियुक्तीचे ठिकाणी रुजू होणे बंधनकारक राहील. (उमेदवारांने कोणत्याही दबा व तंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द करणेत येईल, अन्यथा त्यांची नियुक्ती आदेश संपुष्टात आणून, प्रतिक्षाधिन यादीतील पुढील उमेदवारांस नियुक्ती देण्यात येईल.)

६)	फॉर्म भरण्यांची अंतिम तारीख दि. २५/०४/२०२५ रोजी ०५.०० वाजेपर्यंत असेल.

७)	इच्छुक उमेदवारांनी फॉर्म सोबत खालील कागदपत्रे १ ते १४ जोडण्यात यावीत, व **मुंबई जिल्हा क्षयरोग नियंत्रण संस्था,उप कार्यकारी आरोग्य अधिकारी (टीबी) यांचे कार्यालय, पहिला माळा, बावलावाडी म्युनिसिपल कार्यालय, व्होल्टास हाऊस समोर, डॉ. बी.आंबेडकर रोड, चिंचपोकली (पू),मुंबई – ४०००१२** या पत्त्यावर दि. २५/०४/२०२५ पुर्वी पोहोचेल अशा रीती ने हस्त देय सादर करावा किंवा टपालाने/कुरीयर ने मिळेल अशा रीतीने पाठवावा. कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी (शनिवार, रविवार व सावर्जनिक सट्टीचे दिवस वगळून) कार्यालयीन वेळेत सकाळी १०.०० ते सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत स्वीकारले जातील.

१)	पुर्ण माहिती भरलेल्या फॉर्मची प्रिंट
२)	वयाचा पुरावा
३)	पदवी/पदविका प्रमाणपत्र (सर्व वर्षांचे प्रमाणपत्र)
४)	गुणपत्रिका
५)	कौन्सिल रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र (As Applicable)
६)	शासकीय/निमशासकीय संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र कागदपत्रे
७)	जात/वैधता प्रमाणपत्र इ छायांकित प्रतींसह
८)	महाराष्ट्र राज्याचा अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)
९)	आधारकार्ड
१०)	पॅनकार्ड
११)	सध्याचा फोटो
१२)	अर्जदार विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र तसेच नाव बदल असल्यास राजपत्र (Gazette)
१३)	वाहन चालविण्याचा परवाना
१४)	लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र (प्रतिज्ञापत्र)

Mahabharti.in

१५) फौजदारी गुन्हा दाखल नसल्याचे हमीपत्र

१६) Online भरणा केलेल्याची पावती

१७) फॉर्मचा अर्ज आवश्यक कागदपत्रे एकाच लिफाफ्यात बंद करुन सादर करावे. सदर लिफाफ्यावर अर्ज केलेल्या महानगरपालिकेचे नाव, अर्जदाराचे नाव व पदाचे नाव नमूद करावे. महानगरपालिकेचे नाव नमूद न केलेले अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही.

१८) सदर पदभरती प्रक्रियेत आवश्यकते नुसार बदल करण्याचे वा सदर पदभरती अंशतः किंवा पुर्ण रद्द करण्याचे अधिकार अध्यक्ष, निवड समिती तथा सदस्य सचिव मुंबई जिल्हा क्षयरोग नियंत्रण संस्था यांना राखून ठेवले आहेत.

https://forms.gle/9rw5nYjFnr9N4kth8

**Sd/-**
अध्यक्ष
निवड समिती
तथा
मुंबई जिल्हा क्षयरोग नियंत्रण संस्था

Mahabharti.in

**फौजदारी गुन्हा दाखल नसले बाबतचे**
**हमीपत्र**

मी.श्री./श्रीमती/कुमारी ____________________________________________ वय _____ वर्ष सध्या राहणार

___________________________________________

_________________________________________________________________

असे लिहुन देते/देतो की, या पत्यावर _______ वर्षापसून आजपर्यंत राहत आहे.

तरी मी वास्तव्य करीत असलेल्या वरील नमूद कालावधीत माझेविरुद्ध मी राहत असलेल्या कार्यक्षेत्रातील पोलीस स्टेशनच्या आभिलेखावर काहीएक दखलपात्र गुन्हा अथवा आक्षेपार्ह नोंदी नाही.

Mahabharti.in

सही/-

**प्रतिज्ञापत्र**
**नमुना – अ**

मी श्री./ श्रीमती/कुमारी ___________________________________________

श्री _________________________________________ यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी वय _______ वर्ष,

राहणार __________________________________________________

__________________________________________________________________याद्वारे असे जाहीर

करतो / करते की,

१) मी ______________________________________________________ या पदाकरिता माझा अर्ज

दाखल केला आहे.

२) आज रोजी मला _____ (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक ३१ जुलै २०२० या नंतर जन्माला

आलेल्या मुलांची संख्या ______ आहे. (असल्यास जन्म दिनाका नमूद करावे).

३) दिनांक २३ जुलै, २०२० रोजी हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २३ जुलै,

२०२० व तदनंतर जन्माला आलेल्या मुलांसाठी या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण सही

दिनांक

Mahabharti.in